जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/०८/२०२३
## दि.१७/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३६३/२०२३,भादविक ३९२,४२०,५०६ १७०,३८४,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-४६ वर्षे,रा.पिंपरी-चिंचवड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात फेसबुक अकाऊंटधारक महीला व दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०८/२०२३ रोजी १७/३० वा. स्वर्णा हॉटेल,वारजे माळवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे फेसबुक अकाऊंटवर नमुद महीलेच्या फेसबुक अकाऊंटवरुन फेसबुक कॉल करुन फिर्यादी यांना स्वर्णा हॉटेल येथे तीचे इतर साथीदारांसह बोलावुन घेवुन,आम्ही सायबर पोलीस असुन तु मुलींना ट्रॅप करतो,त्यांचे व्हिडोओ काढतो हे आम्हाला चेक करायचे आहे अशी बतावणी करून,आमच्याबरोबर चौकीला चल अशी त्यांना धमकी देवुन ते सायबर विभागाचे पोलीस नसताना,पोलीस असल्याची बतावणी करुन,वारजे माळवाडी येथील बँकचे एटीएम मधुन फिर्यादी यांचेकडुन एकुण ५३,५००/- रूपये जबरदस्तीने त्यांना काढुन देण्या करीता फिर्यादीस भाग पाडुन त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ओलेकर ९८५२८५२३६९ / ७५०६०७२७११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५६९/२०२३,भादविक २७९,३०४(२),३३७,३३८,मो.वा.का.कलम १८५,१८४, ११९/१७७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२४ वर्षे,रा.विमाननगर,पुणे |
| **आरोपीत** | कारवरील चालक इसम (जखमी आहे) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०८/२०२३ रोजी पहाटे ०४/३० वा.संगमवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही दारु पिऊन अपघात होऊन एखादयाचा जीव जाऊ शकतो हे त्यास माहीती असताना,सुध्दा जाणीवपुर्वक सदरची कार भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणे,वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून चालवून,स्वतःचे कारचा आपघात करुन,त्याचे कार मध्ये पाठीमागे बसलेली ऋतुजा विनोद भालेराव,वय-२३ हिचे मृत्यूस व फिर्यादी यांना गंभीर जखमी करणेस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विशाल पाटील ९७६६७६४४७१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १३६/२०२३,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | राहुल शिंदे,वय ३७ वर्षे,रा.चिंचवड,पुणे |
| **आरोपीत** | तेजस सोमनाथ वसवे,वय २४ वर्षे,रा.दामोदर व्हिला,धायरी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे एप्रिल २०२३ ते जुलै २०२३ रोजीचे कालावधीत लायकन इलेक्ट्रीक प्रा. लिमी. शांतीशिला सोसा.एपिक सेंटर,ॲपेक्स कॉलनी,लॉ कॉलेज रोड,पुणे येथे |

**तपशिल** यातील फिर्यादी हे काम करीत असलेल्या लायकन इलेक्ट्रीक प्रा.लिमी.कंपनीचे शो-रुम मध्ये काम करणारा यातील नमुद इसमाने लायकन कंपनीचे इलेक्ट्रीक दुचाकी विक्रीतुन आलेली एकुण ९,७३,२३०/- रक्कम फिर्यादी यांचे कंपनीचे मालकांच्या संमतीशिवाय चोरी केली आहे. (फिर्यादी यांनी कंपनीचे बँक खात्याची माहिती घेवुन आज रोजी तक्रार दिली आहे.)

**त.अंमलदार** सहा.पो.फौज. चव्हाण ९९२३४४२३५३

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोरेगांव पार्क पो स्टे १३३/२०२३,भादविक ३७९

**फिर्यादी** उमेश कसबेकर,वय ४८ वर्षे,रा.कोरेगाव पार्क,पुणे

**आरोपीत** अनोळखी दोन इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१३/०८/२०२३ रोजी पहाटे ०३/३० वा.०३ चंदनाची झाडे व दि.१७/०८/२०२३ रोजी पहाटे ०४/०० वा.ते ०४/१५ वा.चे दरम्यान ०१ चंदनाचे झाड,१२१ मोरवी हाऊस,लेन नं.४,धारीवाल बंगल्या समोर,कोरेगाव पार्क,पुणे येथे मोरवी हाऊस बंगल्याचे पोर्चच्या खिडकी जवळ

**तपशिल** यातील फिर्यादी हे मोरवी हाऊस (बंगला) मध्ये केअर टेकर म्हणुन काम पाहतात. मोरवी हाऊस बंगल्याचे परिसरातील एकुण ०४ चंदनाची झाडे दोन अनोळखी इसमांनी लोखंडी करवतीच्या सहाय्याने बुंध्यापासुन कापुन चोरी करुन नेले आहे

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. दत्तात्रय लिगाडे ९७६७१००८१२

## दि.१८/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** वानवडी पो स्टे ४०५/२०२३,भादविक ३०२,३०७,३२३,५०४,१४३,१४४,१४७,१४८,१४९,क्रिमीनल ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ७,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),मपोका ३७(१)(३)१३५

**फिर्यादी** एक नागरीक,वय ६४ वर्ष,रा.सैय्यदनगर,हडपसर,पुणे

**आरोपीत** दोन इसम व त्यांचे इतर १० साथीदार (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१७/०८/२०२३ रोजी २०/०० वा. ए.एस.आर. गॅरेजचे बाजुची गल्ली,गुलाम अलीनगर,गल्ली नं.०३,हडपसर,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद दोन इसमांनी दिनांक १६/०८/२०२३ रोजी झालेल्या भांडणाबाबत चर्चा करण्याचा बहाणा करुन,फिर्यादी व त्यांची दोन मुले अजीम वजीर शेख व अल्ताफ वजीर शेख तसेच त्यांचेसोबत असलेले रेहान रियाज खान, शाहारुख सलीम शेख, शकील अन्सारी यांना बोलावन घेवुन,सदर ठिकाणी चर्चा चालु असताना,त्यांचेकडील लोखंडी धारधार हत्यार व लोखंडी रॉडने अजीम वजीर शेख,वय-२४ वर्षे,रा.गल्ली नं.१२,अे,सैय्यदनगर,महंमदवाडी रोड,हडपसर,पुणे यास जीवे ठार मारण्याच्या उद्येशाने धारधार शस्त्राने शरिरावर वार करून त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारले आहे. तसेच फिर्यादी व त्यांचा लहान मुलगा अल्ताफ तसेच फिर्यादी समवेत असलेले १)अल्ताफ ऊर्फ नॉडी वझीर शेख २)रेहान रियाज खान ३)शकील इजहार अन्सारी ४)शाहरुख सलीम शेख ५)वजीरअली मेहबुबअली शेख यांना धारधार शस्त्राने वार करून,लाकडी दांडक्याने,हाताने मारहाण करुन मारून त्यांना गंभीर जखमी करुन शिवीगाळ केली आहे. त्यानंतर सदर ठिकाणी जमलेल्या लोकांकडे बघुन, त्याचे हातातील हत्यारे हवेत फिरवुन "हम यहा के भाई है,हमारे नाद को लगने का नही,नही तो किसीको छोडुंगा नही" असे जोर-जोरात ओरडुन,त्याचे हातातील हत्यारे हवेत फिरवुन, जमलेल्या लोकांचे मनात भीती निर्माण होईल असे कृत्य केले आहे.

**त.अंमलदार** पोलीस निरीक्षक,(गुन्हे), विनय पाटणकर ८६९१९९९६८९

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**